FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154168

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. मुं, पहिली खबर क्र. FIR No. 10, वर्ष Year 2021, दिनांक Date 05/03/2021

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र.क. 1988, कलमे Sections 7, 12
   (ii) अधिनियम Act ..., कलमे Sections ...
   (iii) इतर अधिनियम व कलने Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day बुधवार, तारीख पासून Date from 03/03/2021 वेळ Time 14:30, तारीख पर्यंत Date to 04/03/2021 वेळ Time 13.49
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 03/03/2021 वेळ Time 15.00
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 08, तारीख Date 05/03/2021 वेळ Time 03.00

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ..., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ...
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S ... Chouki / Beat / O.P. Name and No. ...
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, उत्तर मुंबई. प्रशासकीय इमारत दादाभाई मार्ग, अंधेरी (प), मुंबई. ठिकाणाचे नंबर No. if any ..., गल्ली Ward ..., रस्त्याचे नाव Name of road ...
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place भवन्स कॉलेज समोर, Village ..., पोस्ट Post ..., तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ...
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ..., तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ...

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्री. अतुल भुईटे
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name रामभाऊ भोज भुईटे
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 62 वर्ष
   (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. 8860458088
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ..., दिल्याचा दिनांक Date of Issue ..., दिल्याचे ठिकाण Place of Issue ..., (f) व्यवसाय Occupation ...
   (g) धर्म Religion बौद्ध, जात Caste चांभार, जनजात Sub-Caste ...
   (h) पत्ता Address : ..., गल्ली / सर्व्हे नं. Ward ..., घर / नाव नं. House/Name No. ..., फोन / मो. नं. Phone/Mo. No. ..., पॅन नं. PAN No. ..., वोटर्स नं. Card No. ...
   रस्त्याचे नाव Road 403/24, बी/पवई, सह्याद्री सोसायटी, ए.एच. मार्ग, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ..., गाव Village ..., पोस्ट Post पवई, पो. स्टे. P. Stn. मुंबई 400076.
   तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ..., सध्याचा पत्ता Present Address ...

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

1) आलोसे भास्करराव आदवराव वंजपाळे, पद - कार्यकारी अभियंता, वर्ग-1
2) आलोसे संतोष अरविंद शिर्के, वय 46 वर्ष, पद - वरिष्ठ लिपिक, वर्ग-3
3) आलोसे महेंद्र भानुदास ठाकूर वय अंदाजे 53 वर्ष, पद - शाखा अभियंता, वर्ग-2



Scanned with CamScanner

यातील फिर्यादी श्री. अच्युत रामभाऊ भुईटे

६२ वर्षे, धंदा - सेवानिवृत्त, रा ही.- 503/24, श्रीपवई सह्याद्री सोसायटी ए.एम. मार्ग पवई, मुंबई 400076 यांचा सविस्तर जबाब संगणकावर स्वतंत्र कागदावर टंकलिखीत केला असून, तिचा गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात आली आहे.

समक्ष

(सुनिल जोशी)
पोलीस निरीक्षक,
ला.प्र.वि., मुंबई.

अच्युत रामभाऊ भुईटे

Scanned with CamScanner

फिर्याद दि. ०४.०३.२०२१

श्री. अच्युत रामभाऊ भुईटे, वय ६२वर्षे, धंदा–सेवानिवृत्त रा.ठि. ५०३/२४, बी/पवई सह्याद्री सोसायटी, ए.एस. मार्ग , पवई, मुंबई–४०००७६, मो.क्र. ९८७०५८०७२८

---------

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर मागील २६ वर्षापासून माझे कुटुंबासह रहात आहे. मी बृहन्मुंबई महानगरपालिका मुंबई येथून चार वर्षापुर्वी सेवानिवृत्त झालो आहे. माझी मुलगी नामे प्रतिज्ञा अच्युत भुईटे ही सिव्हिल इंजिनियर असुन तिच्याकडे बांधकाम व्यवसायाचा परवाना देखील आहे. ती सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत होणाऱ्या बांधकाम दुरुस्तीचे कॉन्ट्रंक्टचे काम करते. त्यामध्ये मी तिला तिच्या कामात मदत करतो.

माझ्या मुलीचे एस.आर.पी.एफ.ग्रुप क्र.८, युनिट २३, गोरेगांव, येथील ८ रुम, चाळ नं.०३ आणि ०४ येथील बाहय व अंतर्गत दुरुस्ती व कलरचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन सन २०१५–१६ मध्ये देण्यात आले होते. सदरचे बाहय व अंतर्गत दुरुस्ती तसेच कलरचे केलेल्या कामाची दोन बिले रक्कम रुपये ७,००,०००/ही कार्यकारी अंभियंता उत्तर मुंबई, (सां.बा.) विभाग अंधेरी पश्चिम मुंबई या कार्यालयात गेली अंदाजे पाच वर्षापासुन साईट इंजिनियर श्री. ठाकुर यांच्याकडे प्रलंबित होती. त्याबाबत सातत्याने मी पाठपुरावा करुन देखील माझ्या मुलीचे बांधकाम संदर्भातील बिल मंजुर केली जात नव्हती. म्हणुन मी साईट इंजिनियर श्री. ठाकुर साहेब यांना बिल मंजुर करण्यासाठी वेळोवेळी भेटत होतो. साधारण दोन वर्षापुर्वी मी श्री. ठाकुर यांच्याकडे बिलाच्या मंजुरी करीता गेलो असता त्यांनी माझ्याकडे रुपये १,५०,०००/– मागितल्याने मी त्यांना सदरची रक्कम नाईलाजास्तव दिली होती. त्यानंतर त्यांनी दोन बिल मंजुरी करिता सुमारे २ महिण्यापुर्वी कार्यकारी अभियंता श्री. मा.या.शंखपाळे यांच्याकडे अंतिम मंजुरी करिता पाठविले असल्याचे त्यांनी मला सांगितले होते.

दिनांक ०१/०३/२०२१ रोजी मी श्री.शंखपाळे साहेबाना त्याच्या कार्यालयात प्रत्यक्ष भेटलो असता त्यांनी मला कार्यालयातील लघु टंकलेखक श्री. संतोष शिर्के यांना भेटण्यास सांगितले. मी श्री. संतोष शिर्के यांच्याकडे गेलो असता त्यांनी मला आमच्या बिलाच्या एकुण रकमेच्या २०% म्हणजेच रुपये १,४०,०००/– दिल्याशिवाय आमची दोन्ही बिल मंजुर होणार नाहीत. तसेच श्री. शंखपाळे साहेब बिलावर सही देखील करणार नाहीत असे सांगितले. त्यावेळी माझ्याकडे फक्त रु.५०,०००/– असल्याने मी श्री. शिर्के यांना नाईलाजास्तव दिले. तेव्हा ''एक बिल मंजुर करण्यासाठी साहेबाकडे पाठवितो व ते बिल तुम्हाला मिळाल्यानंतर उर्वरीत रुपये ९०,०००/– मला आणुन दया मगच तुमचे दुसरे बिल मंजुर केले जाईल'' असे श्री. शिर्के यांनी मला सांगितले.

कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सां.बा) विभाग, अंधेरी मुंबई येथीलसचिव सहाय्यक श्री. संतोष शिर्के, यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिनांक ०३/०३/२०२१ रोजी तक्रार देण्यासाठी गेलो व लाचलुचपत प्रतिबंध कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो व त्यांना लेखी तक्रार दिली. माझ्या तक्रारीवर कारवाई करण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन पो.नि. लांघी व सपोआ. कालेकर यांना नेमण्यात आले होते. त्यांनी दोन शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची माझेशी ओळख करून दिली. पो.नि. लांघी यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो. नि. लांघी यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि.लांघी यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला. सायंकाळी १५.३० वाजता पंचासमक्ष कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सां.बा) विभाग, अंधेरी मुंबई येथील सचिव सहाय्यक श्री. संतोष शिर्के यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

पो.नि.लांघी यांनी माझी पडताळणी पथकाशी ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून अंधेरी पश्चिम रेल्वे स्टेशनजवळील बेस्ट बस स्टॉपपाशी थांबलो. त्यानंतर मला पो.नि.लांघी यांनी सचिव सहाय्यक श्री. संतोष शिर्के, कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सां.बा) विभाग, अंधेरी मुंबई यांचे कार्यालयात

Scanned with CamScanner

पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. पारीसे यांचे सह पाठविले असता श्री.शिर्के यांची भेट झाली. त्यानंतर श्री.शिर्के आणि श्री. ठाकुर यांचेशी माझ्या बाकी बिलाबाबत असलल्या कामासंदर्भात वेगवेगळी चर्चा झाली. चर्चेदरम्यान लोकसेवक श्री. शिर्के यांनी माझेकडे रू. १०,०००/– लाचेची मागणी केली. त्यावेळी शिर्के यांनी मला सांगितले की, तुम्हाला सांगितल्याप्रमाणे तुम्ही उदया पैसे घेवुन या तुमचे काम करून टाकतो. तसेच श्री ठाकुर यांनी मला लाचेची रक्कम माझे काम करण्याकरीता श्री शिर्के व श्री शंखपाळे यांना देण्याबाबत सांगितले तसेच मी त्यांना लाच दिली नाही तर माझे काम होत नाही याबाबत मला सांगितले. त्यानंतर मी व पंच श्री. पारीसे असे कार्यालयाच्या बाहेर निघुन आलो

मी व पंच असे ठरल्याप्रमाणे अंधेरी पश्चिम रेल्वे स्टेशनजवळील बेस्ट बस स्टॉपजवळ उभ्या असलेल्या पोलीस वाहनाजवळ आलो. पोनि लांघी यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. लोकसेवक श्री. शिर्के याने पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने, तसेच श्री ठाकुर हे मला लाचेची रक्कम श्री शिर्के व श्री शंखपाळे यांना देण्यास प्रवृत्त केल्याचे निष्पन्न झाल्याने व लोकसेवक श्री. शिर्के यांनी ठरल्याप्रमाणे दिनांक ०४ ०३ २०२१ रोजी लाचेची रक्कम घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सपोआ श्री कालेकर व पो.नि.लांघी यांनी सांगितले की, लोकसेवक यांनीलाचेची रक्कम मागणी केली असल्याने सापळा कारवाई करावयाची आहे, मला उदया दिनांक ०४/०३/२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी मुंबई येथे लोकसेवक श्री.शिर्के याने मागणी केल्याप्रमाणे रुपये ९०,०००/– घेवुन येण्यास सांगितले ज्यास मी तयार होतो.

त्याप्रमाणे आज दिनांक ०४/०३/२०२१ रोजी मी रुपये २०००/– च्या भारतीय चलनाच्या ४५ नोटा लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी मुंबई येथे घेवुन आलो. त्यानंतर पो.नि.लांघी यांनी मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. माझे कडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. ९०,०००/–(रू. २०००/– दराच्या ४५ भारतीय चलनी नोटा) त्यांनी स्वतःचे ताब्यात घेतल्या व त्यांच्या झेरॉक्स काढल्या. सदर नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. पोनि लांघी यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझा चेहऱ्यावर लावलेला चष्मा काढुन हातरुमालाने पुसणे असे पुर्व नियोजीत इशारा करावा, त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहाथ पकडतील असे सांगितले.

त्यानंतर पोलीस वाहनात पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावली व सदरची रक्कम एका खाकी रंगाच्या लिफाफ्यात भरुन त्या लिफाफ्याला सुध्दा अँथ्रासीन पावडर लावुन ते पैशानी भरलेले पाकिट माझेकडे दिले व माझे शर्टाचे आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून पंच श्री. पारीसे यांचेसह सापळा कारवाईकरीता लोकसेवक श्री.शिर्के यांचे कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सां.बा) विभाग, अंधेरी मुंबई येथे पाठविले. माझे पाठोपाठ पोलीस पथक काही अंतर ठेवून होते. मी, लोकसेवक श्री.शिर्के यांच्या कार्यालयात ते जेथे बसतात तेथे गेलो व श्री. शिर्के यांच्याशी कामासंदर्भात चर्चा करीत असतानाच त्यांनी माझेकडे लाचेच्या रक्कमेची मागणी केली. त्यानंतर मी श्री शंखपाळे यांच्या कॅबीनमध्ये जावुन त्यांना त्यांच्या वतीने श्री शिर्के हे लाचेची रक्कमेची मागणी करीत असल्याबाबत कल्पना देवुन ते व श्री शिर्के हे मागणी करीत असलेल्या लाचेची रक्कम यापुर्वी श्री संतोष शिर्के यांनी ठरवुन दिल्याप्रमाणे ते त्यांच्या ताब्यात देणार असल्याचे सांगितले ज्यास श्री शंखपाळे यांनी स्पष्ट संमती देवुन "ठिकये दया" असे सांगुन लाचेची रक्कम त्याना तसेच श्री शिर्के यांना मी दयावी याकरीता स्पष्ठ संमती व परवानगी दिली. मी त्यानंतर त्यांच्या कॅबीनच्या बाहेर आलो. त्यानंतर परत एकदा श्री शिर्के यांच्या सोबत चर्चा केली. श्री शिर्के हे पुन्हा श्री शंखपाळे यांच्या कॅबीनमध्ये गेले व त्यांनी यापुर्वी मागणी केलेली लाचेची रक्कमेची मागणी केली जी मी त्यांना यापुर्वीच आणलेल्या खाकी रंगाच्या लिफाफा ज्यामध्ये अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. ९०,०००/–(रू. २००० दराच्या ४५ भारतीय चलनी नोटा) होती ती मी त्यांच्या हातात दिला असता तो त्यांनी दोन्ही हातात घेउन त्यांचे उजव्या बाजुच्या ड्रॉवरमध्ये ठेवला. लोकसेवक श्री.शिर्के

Scanned with CamScanner

लाचचा रक्कम घतल्यानतर मा त्या कार्यालयाच्या बाहेर [illegible] चेहऱ्यावर लावलेला चष्मा काढुन हातरुमालाने पुसुन ठरल्याप्रमाणे सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पोलीसांनी तात्काळ लोकसेवक श्री.शिर्के पकडले. त्यानतर त्यांचे ड्रावरमध्ये ठेवलेली लाचेची रक्कम रु. ९०,०००/– पंचानी ताब्यात घेतली.

दिनांक ०१/०३/२०२१ रोजी माझी मुलगी नामे प्रतिज्ञा हिने गोरेगांव एसआरपी कॅम्प या ठिकाणी केलेल्या दुरुस्तीबाबतच्या बिलाची रक्कम रुपये ७,००,०००/– मंजुर होवुन ती मिळण्याकरिता कार्यकारी अभियंता उत्तर मुंबई (सां.बा), विभाग, अंधेरी, मुंबई येथील सचिव सहाय्यक श्री.शिर्के त्यांच्याकरीता तसेच श्री शंखपाळे कार्यकारी अभियंता यांच्याही करीता त्यांनी माझेकडे बिलाच्या रकमेच्या २०% म्हणजेच रु. १,४०,०००/– मागणी केली. तेव्हा मी श्री.शिर्के यांना रुपये ५०,०००/– दिले व एक बिल मंजुर करण्याकरिता पाठवितो व त्या बिलाची रक्कम मिळाल्यानंतर रुपये ९०,०००/– दया तरच तुमचे दुसरे बिल मंजुर करतो अशा प्रकारे लाचेची मागणी करून तसेच मला त्यांना लाच देण्याकरीता श्री ठाकुर यांनी अपप्रेरणा दिली. दिनांक ०४/०३/२०२१ रोजी श्री. शिर्के यांने स्वत:करीता व श्री शंखपाळे यांच्याकरीता माझ्याकडे रुपये ९०,०००/– ची लाचेची मागणी करुन सदरची रक्कम स्वीकारली म्हणुन माझी श्री संतोष शिर्के, श्री शंखपाळे व श्री ठाकुर यांचे विरूध्द कायदेशीर तक्रार आहे. सदर वेळी पोलिसांनी तेथील कार्यालयाची झडती घेतली असता श्री संतोष शिर्के हे जेथे बसत होते व त्याच्या ताब्यात,कब्जात असलेल्या कपाटातुन व त्यांच्या बॅगेतुन १३,१५,०००/– रू. भारतीय चलणी नोटा मिळुन आल्या. त्याबाबत पोलिसांनी त्यांना विचारले असता श्री संतोष शिर्के हे कोणतेही उत्तर देवु शकले नाही. त्यामुळे ती रक्कम सुध्दा वेगवेगळया इसमांनकडुन लाचेच्या स्वरूपात श्री संतोष शिर्के यांनी स्वत: व श्री शंखपाळे यांच्याकरीता एकत्रित रित्या प्राप्त केली असावी. माझे लोकसेवक श्री संतोष शिर्के, श्री शंखपाळे व श्री ठाकुर यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मी वाचून पाहिली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

(सुनिल लोंढे),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

अच्युत रामभाऊ भुरे

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..............................

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..............................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..............................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे मुलीचे कार्यकारी अभियंता कार्यालय, उ. मुंबई, अंधेरी (प) येथे साल २०१५-१६ या काळात केलेल्या कामाचे प्रलंबित ७ लाख रु. ची मंजुरी मिळविण्याकरिता फिर्यादी यांचेकडून आरोपी क्र.२ यांनी रु. २,५०,०००/- घेवून बिले अंतिम मंजुरी पर्यंत पाठवली. त्यानंतरच्या मंजुरीसाठी फिर्यादी हे आरोपी क्र.१ यांना भेटले. त्यांचे सांगणे फिर्यादी आरोपी क्र.२ यांना भेटले. आरोपी क्र.२ यांनी एकूण बिलाच्या २०%, म्हणजे रुपये १,४०,०००/- ची मागणी केली. यांतील त्यांनी रु. ५०,०००/- स्वीकारले. बाकी बिल मंजूर उर्वरित बिलाच्या मंजुरीसाठी रु. ९०,०००/- ची रक्कम साठी व आरोपी क्र.१ यांचे साठी मागणी केली. दिनांक ०४/०३/२०२१ रोजी आरोपी क्र.२ यांनी रु. ९०,०००/- लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार आरोपी क्र.२ यांनी व आरोपी क्र.१ यांच्यासाठी लाच स्वीकारली व यांस आरोपी क्र.१ ने [illegible] दिले [illegible] नोंद

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पो. नि. सुनिल लांडे, ला. प्र. वि., मुंबई.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..............................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .................., जिल्हा .................., राज्य ..................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................ Rank............... No............... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................. (3) Transferred to P. S. ..............................

District.................................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant

मला फिर्यादीची प्रत मिळाली.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ...सुनिल लांडे...

पदनाम Rank ...पोलीस निरीक्षक.

तपासिक अं. चा कोड क्र. ला. प्र. वि., मुंबई.

Posting

Code No. of I. O. ..............................

15. 1. न्यायालयात सादर केल्याची तारीख..................

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with CamScanner